# राष्ट्रसंचार

गुरूवार २७ मार्च २०२५


## राम नदी सेवक सन्मान




पुणे 'राम नदी पुनरूज्जीवन अभिमान' ला नुकतीच पाच वर्षे पूर्ण झाली असून यानिमित्त किर्लोस्कर वसुंधरातर्फे आयोजित पाचव्या ऑनलाईन 'किर्लोस्कर वसुंधरा राम नदी महोत्सवा' च्या समारोप प्रसंगी डॉ. श्रीनिवास वडगबाळकर यांना पहिला राम नदी सेवक सन्मान प्रदान करताना ज्येष्ठ पर्यावरण तज्ज्ञ, लेखक आणि अभ्यासू विचारवंत डॉ. माधव गाडगीळ. यावेळी (डावीकडून) वीरेंद्र चित्राव, डॉ. गाडगीळ, वडगबाळकर, आनंद चितळे आणि डॉ. गुरुदास नूलकर.

## पर्यावरण संरक्षण सामुहिक जबाबदारी : डॉ. वडगबाळकर


■ राष्ट्र संचार न्यूज़ नेटवर्क


**पुणे :** पर्यावरण संवर्धन, जतन आणि संरक्षण ही आपली सामुहिक जबाबदारी असून ते आपण कर्तव्य भावनेने केले पाहिजे, असे मत ज्येष्ठ पर्यावरण तज्ज्ञ आणि राम नदीचे अभ्यासक डॉ. श्रीनिवास वडगबाळकर यांनी व्यक्त केले.

राम नदीशी नाते निर्माण व्हावे, तिच्या जैवविविधतेचा अभ्यास व्हावा, तिची स्वच्छता राखण्यासाठी तरुण पिढी प्रेरीत व्हावी सुरू करण्यात आलेल्या 'राम नदी पुनरूज्जीवन अभिमान' ला नुकतीच पाच वर्षे पूर्ण झाली असून यानिमित्त किर्लोस्कर वसुंधरातर्फे आयोजित पाचव्या ऑनलाईन 'किर्लोस्कर वसुंधरा राम नदी महोत्सवा'च्या समारोप प्रसंगी डॉ. श्रीनिवास वडगबाळकर यांना ज्येष्ठ पर्यावरण तज्ज्ञ, लेखक आणि अभ्यासू विचारवंत डॉ. माधव गाडगीळ यांच्या हस्ते पहिला राम नदी सेवक सन्मान प्रदान करण्यात आला, त्यावेळी पुरस्काराला उत्तर देताना डॉ. श्रीनिवास वडगबाळकर बोलत होते.

पत्रकार भवन येथे झालेल्या या कार्यक्रम प्रसंगी व्यासपीठावर फॅसिलिटेटर आनंद चितळे, किर्लोस्कर वसुंधराचे क्युरेटर डॉ. गुरुदास नूलकर आणि 'किर्लोस्कर वसुंधरा'चे संयोजक वीरेंद्र चित्राव आदी मान्यवर उपस्थित होते.


Service By: Vidisha Media Network- 9881736077